MHLA120013112025

## <u>निशाणी क्रमांक ०१ वर आदेश</u>

०१. अर्जदार **मयत दिपक संभाजी भोसले तर्फे सुनिता भ्र. दिपक भोसले + ०४** यांनी प्रस्तूतचा अर्ज ***<u>मुंबई नियमन, १८२७ चा नियम ०२</u>*** अनुसार वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेसाठी दाखल केला.

०२. अर्जातील कथन असे आहे की, **संभाजी तुकाराम भोसले** यांचा मृत्यू दिनांक **०७.०२.२०२४** रोजी **मौजे सालेगाव, ता. लोहारा, जिल्हा उस्मानाबाद** येथे झाला आहे. अर्जदार हे मयताचे वारस असल्याने त्यांना वारस प्रमाणपत्राची (Heirship Certificate) आवश्यकता आहे.

०३. अर्जदार हे मयताचे वारस आहेत किंवा कसे किंवा त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणी वारस आहे काय याची पडताळणी करण्यासाठी **दैनिक रत्नापूर समाचार** या वर्तमानपत्रातून जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला होता, व त्या अनुषंगाने संबंधितांना हरकती उपस्थित करण्याबाबत निमंत्रीत केले होते. सदर वर्तमानपत्राची प्रत **<u>नि.क्र.११</u>** वर आहे. तसेच सदर जाहिरनाम्याची प्रत अन्य ठिकाणी प्रसिध्दीस देवून त्याबाबतचा अहवाल दाखल करुन घेतला, परंतू कोणीही मयताचे वारस असलेबाबत आजपावेतो हरकत उपस्थित केलेली नाही.

०४. अर्जदार क्रमांक १/४ ने पुराव्याचे शपथपत्र **नि.क्र.१८, संभाजी तुकाराम भोसले** यांचे मृत्यू प्रमाणपत्र **नि.क्र.०६** दाखल केले आहे. मयताची पत्नी, आई व मुलगा हे पुर्वीच मयत झाल्याबाबत शपथपत्रात नमूद केले आहे. अर्जदारांनी पुरावा बंद पुरसीस **नि.क्र.१९** दाखल केली आहे.

०५. अर्जदारांचा पुरावा व दाखल कागदपत्रावरुन ते वारस असल्याचे दिसते. अर्जदार हे मयताचे वारस असल्याने त्यांना वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) देण्यास कोणतीही कायदेशीर अडचण नाही. सबब खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

०१. अर्जदार **सुनिता भ्र. दिपक भोसले + ०४** यांनी ***मुंबई नियमन, १८२७ चा नियम ०२*** प्रमाणे दाखल केलेला अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. अर्जदारांना **मयत संभाजी तुकाराम भोसले** यांचे **मान्यताप्राप्त वारस** या नात्याने वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) देण्यात येत आहे.

०३. अर्जदारांनी आवश्यक न्यायालयीन शुल्क भरण्याची पूर्तता करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.05.02 13:18:26 +0530

**(श्रीमती. ए. एस. गुंजवटे.)**

**दिनांकः– ०२.०५ .२०२६.सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, निलंगा.**

**ठिकाण – निलंगा. जिल्हा लातूर.**